www.lokrakshanay.com
लोकशाहीच्या संरक्षणार्थ
# लोकरक्षणाय
●LOKRAKSHANAY ●RNI.REG.NO.MAHBIL/2023/86118
●Executive editor- Aniket Ghanshyam Bhankal ●Daily ●Thane ●Volume-01, Issue-236 ● Sunday, 04 February 2024 ●Pages-04 ●Rs.2/-

### अनमोल विचार

"लोक आपल्यावर दगडफेक करतीन तर आपण त्या दगडाला मैलाचा दगड बनवा."

## लक्षवेधी

### पंजाबचे राज्यपाल बनवारी लाल पुरोहित यांचा राजीनामा; राजकीय वतुर्ळात उलटसुलट चर्चा

**नवी दिल्ली :** पंजाब आणि केंद्रशासित प्रदेश चंदीगडचे राज्यपाल बनवारीलाल पुरोहित यांनी आपल्या पदाचा राजीनामा शनिवारी (3 फेब्रुवारी) दिला आहे. वैयक्तिक कारणे आणि इतर काही जबाबदाऱ्या यामुळे आपण राजीनामा देत असल्याचे त्यांनी म्हटले आहे. मात्र, असे असले तरी या राजीनाम्याचे राजकीय वतुर्ळात वेगवेगळे अर्थ काढले जात आहेत. पाठिमागील काही दिवसांपासून राज्यपाल पुरोहीत आणि पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या नेतृत्वाखालील सरकारमध्ये प्रचंड तणाव होता आणि तो दिवससेंदिवस वाढतच होता. कास करुन विधिमंडळांने बहुमताने संमत केलेल्या विधेयकांवर स्वाक्षकीर करण्यावरुन हा तणाव वाढत होता.

### भाजपच्या खासदार रीता बहुगुणा जोशी यांना 6 महिन्यांचा तुरुंगवास

**नवी दिल्ली :** 2012 च्या निवडणुकीत आचारसंहितेचे उल्लंघन प्रकरणात भाजपच्या खासदार डॉ. रीता बहुगुणा जोशी या दोषी ठरल्या आहेत. त्यामुळे खासदार/आमदार न्यायालयाच्या विशेष दंडाधिकारी अंबरीश कुमार श्रीवास्तव यांनी जोशी यांना 6 महिन्यांचा तुरुंगवासासह 1100 रुपये दंड भरण्याची शिक्षा सुनावली आहे. 2012 च्या निवडणुकीत डॉ. जोशी या काँग्रेसच्या उमेदवार होत्या. फिर्यादीच्या वतीने सहसंचालक वेदप्रकाश त्रिपाठी यांनी सांगितले की, हा खटला निवडणुकीचे स्टॅटिक सर्व्हिलन्स मॅजिस्ट्रेट मुकेश चतुवेदी यांनी नोंदवला होता.खटल्यानुसार, रिटा बहुगुणा जोशी या कँट विधानसभा मतदारसंघातून उमेदवार होत्या. 17 फेब्रुवारी 2012 रोजी सायंकाळी 6.50 च्या सुमारास कृष्णानगर येथील बजरंग नगर भागात त्या एका जाहीर सभेला संबोधित करत होत्या.

### मालदीवच्या राष्ट्राध्यक्षांना झटका, भारतीय सैन्य मागे नाही घेणार भारत

**नवी दिल्ली :** मालदीव यांच्यातील तणावामुळे दोन्ही देशातील संबंध ताणले गेले होते. मालदीवचे नवे राष्ट्राध्यक्ष मोहम्मद मुइज्जू यांनी मालदीवमधून भारतीय सैन्याला माघारी बोलवण्याची मागणा केली होती. पण भारत भारतीय सैन्य माघारी बोलवणार नाहीये. कारण भारत आपले सैनिक मागे घेण्याऐवजी त्यांची अदलाबदल करेल. मालदीव आणि भारत यांच्यातील उच्चस्तरीय बैठकीनंतर हा निर्णय घेण्यात आला आहे. दिल्लीत दोन्ही देशांच्या कोअर ग्रुपची बैठक पार पडली, ज्यामध्ये मालदीवमधून भारतीय लष्करी जवानांना परत बोलवण्याच्या मुद्द्यावर चर्चा करण्यात आली.

### 'शत्रूला समुद्राच्या तळाशी जाऊन शोधून काढू अन् नेस्तनाबूत करू'; संरक्षण मंत्र्यांचा निर्धार

**नवी दिल्ली :** भारतीय नौदलाला आता आणखी एक स्वदेशी युद्धनौका मिळाली आहे, जी समुद्रातील धोक्यांचा क्षणार्धात मुकाबला करेल आणि चीन-पाकिस्तानला चांगलाच दणका देईल. शनिवारी कव्हर संध्याकचा नौदलाच्या ताफ्यात समावेश करण्यात आला. ही युद्धनौका समुद्रातील अडचणींचा सामना करण्यात माहिर आहे. त्यावर बोफोर्स तोफा बसवण्यात आल्या आहेत. ही युद्धनौका पाण्यात धावताच शत्रूवर मात करण्यास सक्षम असेल. या दरम्यान संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी आयएनएस संध्याकच्या कमिशनिंग सोहळ्यात सांगितले की, भारतीय नौदलासाठी आजचा दिवस ऐतिहासिक आहे. आमच्या नौदलात आयएनएस संध्याकचा समावेश झाल्यामुळे संपूर्ण प्रदेशात शांतता आणि सुरक्षा राखण्यात आमच्या नौदलाला नक्कीच मदत होईल, असे म्हणत त्यांनी भारतीय नौदलाचे अभिनंदन केले.

### काँग्रेसशी सहमत नसलेल्या लोकांनी पक्ष सोडलेलाच बरा ! - राहुल गांधी

**नवी दिल्ली :** काँग्रेसच्या विचारधारेशी सहमत नसलेल्या हिमंत बिस्वा शर्मा आणि मिलिंद देवरा यांच्यासारख्या नेत्यांनी पक्ष सोडलेलाच बरा, असे काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी म्हटले आहे. 2014मध्ये भाजपमध्ये प्रवेश केलेले सरमा आता आसामचे मुख्यमंत्री आहेत, तर देवरा यांनी गेल्या महिन्यात शिवसेना शिंदे गटात प्रवेश केला आहे. अशा मंडळींनी पक्ष सोडावा असंच मला वाटतं. मला त्याचे काहीही वाटणार नाही.हिमंता ज्या विशिष्ट प्रकारच्या राजकीय विचारधारेचे प्रतिनिधित्व करतात ती काँग्रेसची विचारधारा नाही, असे राहुल म्हणाले.

### PM बाकी सर्व विषयांवर बोलतात, पण मणिपूरवर नाही, मोदींच्या कृपेने...; खरगेंची भाजपावर टीका

**नवी दिल्ली :** देशभरात दर २ तासांनी एससी-एसटी समाजातील ५ लोक विविध गुन्ह्यांचे बळी ठरतात. पंतप्रधान मोदी प्रत्येक विषयावर बोलतात, पण मणिपूरच्या मुद्द्यावर काहीच बोलत नाहीत. सरकार नेहमीच ओबीसी आणि महिला आरक्षणाबाबत बोलत असते. मात्र, नुकतीच यासंदर्भात सर्वोच्च न्यायालयात याचिका दाखल झाली आहे असून, केंद्राने त्याविरोधात प्रतिज्ञापत्र का दिले, अशी विचारणा काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन यांनी राज्यसभेत बोलताना केली. राज्यसभेत बोलताना मल्लिकार्जुन खरगे यांनी भाजपा आणि केंद्र सरकारवर सडकून टीका केली.

### दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल यांच्या निवासस्थानी गुन्हे शाखेचे पथक दाखल ; पोलीस सुरक्षेत वाढ

**नवी दिल्ली :** मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या निवासस्थानी दिल्ली गुन्हे शाखेचे एक पथक दाखल झाले आहे. काल संध्याकाळी उशिरादेखील गुन्हे शाखेची टीम नोटीस घेऊन मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी पोहोचली होती, मात्र कोणालाही नोटीस न मिळाल्याने दिल्ली पोलिस रात्री तेथून परतले. सध्या दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी पोलिस सुरक्षा वाढवण्यात आली आहे. दिल्लीच्या मुख्यमंत्र्यांच्या कार्यालयाने नोटीस घेण्याचे मान्य केले आहे. तर सीएमओ पावती देण्यास तयार नसल्याचे गुन्हे शाखेच्या पथकाने म्हटल्याचे सांगण्यात येत आहे. गुन्हे शाखेची टीम काल संध्याकाळी उशिरा मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल यांच्या घरी नोटीस देण्यासाठी पोहोचली होती. मात्र मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानी कोणीही नोटीस स्वीकारली नाही.

## राज्य मागासवर्ग आयोगामार्फतचे मराठा समाज व खुल्या प्रवर्गांचे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सर्वेक्षणाचे मिशन पूर्ण




**■मुंबई। यश सावंत,**

महाराष्ट्र राज्य मागासवर्ग आयोगामार्फत मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील सामाजिक, शैक्षणिक, आर्थिक मागासलेपण तपासण्यासाठी सर्वेक्षण पूर्ण करण्यात आल आहे. दिनांक 23 जानेवारी 2024 ला या सर्वेक्षणाला सुरुवात झाली ते 1 फेब्रुवारी 2024 या दिवसांमध्ये हे सर्वेक्षण 100 टक्के पूर्ण झाल्याचे बृहन्मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून सांगण्यात आल. या सर्वेक्षणासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने साधारणपणे 30 हजार कर्मचा-यांची नियुक्ती करण्यात आली होती. या कर्मचाऱ्यांनी सदर कालावधीत मुंबईतील सर्व विभागात (वॉर्ड) घरोघरी जाऊन महानगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांनी हे सर्वेक्षण निधारीत कालावधीत पूर्ण केलंय.

राज्य मागासवर्ग आयोगाच्या निदेर्शाप्रमाणे बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रात दिनांक 23 जानेवारी 2024 पासून बृहन्मुंबई महानगरपालिका हद्दीत मराठा तसंच खुल्या प्रवर्गातील नागरिकांचे सर्वेक्षण सुरु केल होतं. नुकतेच हे सर्वेक्षण पूर्ण झालं असून बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील 38 लाख 79 हजार 46 इतक्या घरांचं सर्वेक्षण करण्यात आलं. यासाठी 30 हजार कर्मचाऱ्यांनी अहोरात्र मेहनत केली आहे. सर्वेक्षणाचे उद्दिष्ट गाठत 1 फेब्रुवारी 2024 ला बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील मराठा/ खुल्या प्रवर्गातील नागरिकांचे सर्वेक्षणाचं काम पूर्ण केलं असल्याची माहिती अतिरिक्त महानगरपालिका आयुक्त (पश्चिम उपनगरे) डॉ. सुधाकर शिंदे यांनी दिली आहे.

राज्य मागासवर्ग आयोगाने पाठविलेल्या 'मास्टर ट्रेनर'ने बृहन्मुंबई महानगरपालिकेतील नोडल ऑफीसर, असिस्टंट नोडल ऑफीसर व मास्टर ट्रेनर यांनी महानगरपालिकेच्या कर्मचारी वर्गाला सर्वेक्षणासाठीचे प्रशिक्षण दिले होते. तसेच सर्वेक्षणासाठी खास अत्याधुनिक सॉफ्टवेअर तयार करण्यात आले होते. सर्वेक्षणादरम्यान एकूण 160 ते 182 प्रश्न असून मराठा समाज व खुल्या प्रवर्गातील कुटुंबाची माहिती प्रश्नावलीद्वारे भरुन घेण्यात आली. सदर माहिती मुलभूत, कौटुंबिक, आर्थिक, सामाजिक, आरोग्य विषयक होती. कुटुंब आरक्षित प्रवर्गातील असल्याची माहिती प्रगणकाला मिळाल्यानंतर त्या कुटुंबाची पुढील माहिती घेण्यात आली नाही. ही कार्यवाही उपायुक्त (सार्वजनिक आरोग्य) संजय कुऱ्हाडे व कार्यकारी आरोग्य अधिकारी डॉ. दक्षा शहा यांच्या दैनंदिन संनियंत्रणात करण्यात आली.

## 'मराठा आणि ओबीसी समाजांत भेदभाव...', भुजबळांचा फडणवीसांना इशारा; म्हणाले, 'तुमचा गृहविभाग...'



**■मुंबई। विशाल कारंडे,**

मराठा समाजाने आरक्षणासाठी काढलेल्या मोर्चानंतर राज्य सरकारने मराठा आंदोलकांच्या अनेक मागण्या मान्य करत अध्यादेश जारी केला आहे. त्यानुसार कुणबी नोंदी सापडलेल्या मराठा समाजातील लोकांना कुणबी जातप्रमाणपत्र दिलं जाणार आहे. तसेच कुणबी प्रमाणपत्र असणाऱ्या व्यक्तीच्या शपथपत्रावर त्यांच्या सगेसोयऱ्यांनाही हे प्रमाणपत्र दिलं जाईल, अशी घोषणा राज्य सरकारने केली आहे. याविरोधात राज्यभरातले ओबीसी नेते आक्रमक झाले आहेत. अशातच ओबीसी नेते तथा राज्याचे अन्न आणि नागरी पुरवठा मंत्री छगन भुजबळ यांनी अहमदनगर येथे ओबीसी आरक्षण बचाव एल्गार मेळावा आयोजित केला आहे. या मेळाव्यात बोलताना छगन भुजबळ यांनी राज्य सरकारविरोधात दंड थोपटले. छगन भुजबळ यांनी यावेळी ओबीसींवरील अन्यायाच्या काही कथित बातम्या वाचून दाखवल्या. भुजबळम्हणाले, 'श्रीगोंद्यात ओबीसी एल्गार सभेची पूर्वतयारी सुरू असताना तिथे पोलीस पाठवण्यात आले आणि काम थांबवण्यात आलं. पोलिसांकरवी ओबीसी समाजात दहशत निर्माण केली जात आहे. त्यांना नोटीसा दिल्या. नोटीस देण्याच्या नावाखाली लोकांच्या सह्या घेतल्या. हे सगळं नेमकं काय चाललंय?' भुजबळ यांनी यावेळी गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांना जाब विचारला. भुजबळ म्हणाले, देवेंद्र फडणवीस साहेब, हे सगळं काय चाललंय. तुमच्या गृह विभागाला सांगा, तुमच्या गृह विभागाकडून असा भेदभाव होता कामा नये. जे काही नियमाने असेल ते सगळ्यांनी करावं. आम्हाला एक न्याय आणि त्यांना रात्री ३ वाजता सभेची परवानगी कशी मिळते?

## डोळ्यांतून अश्रू तरळले, भारतरत्न मिळाल्यावर लालकृष्ण अडवाणी झाले भावूक

**■नवी दिल्ली। प्रगती शर्मा,**

भाजपचे ज्येष्ठ नेते देशाचे माजी उपपंतप्रधान लालकृष्ण अडवाणी यांना केंद्र सरकारने भारतरत्न हा देशाचा सर्वोच्च नागरी पुरस्कार जाहीर केला. याबाबत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी एक्सवर पोस्ट करुन माहिती दिली. भारतरत्न पुरस्कार जाहीर झाल्यानंतर लालकृष्ण अडवाणी यांची पहिली प्रतिक्रीया समोर आली आहे.



पुरस्कार जाहीर झाल्यानंतर लालकृष्ण अडवाणींच्या कुटुंबीयांनी आनंद व्यक्त करत पंतप्रधान मोदींचे आभार मानले आहेत. लालकृष्ण अडवाणी यांची कन्या प्रतिभा अडवाणी ही अडवाणींसोबत त्यांच्या दिल्लीतील निवासस्थानी आहे. यावेळी त्यांनी वडिलांचे अभिनंदन केले. दरम्यान, लालकृष्ण अडवाणींनी हात जोडून अभिवादन केले. यावेळी प्रतिभा अडवाणी म्हणाल्या की, लालकृष्ण अडवाणी यांना देशाचा सर्वोच्च सन्मान मिळाल्याने संपूर्ण कुटुंब खूप आनंदी आहे. आज मला माझ्या आईची सर्वात जास्त आठवण येते कारण वडीलांच्या आयुष्यात त्यांचे योगदान मोठे आहे, मग ते वैयक्तिक असो वा राजकीय जीवन. जेव्हा मी पुरस्काराबाबत त्यांना सांगितले तेव्हा ते खूप आनंदी झाले आणि म्हणाले की त्यांनी आपले संपूर्ण आयुष्य आपल्या देशाची सेवा करण्यात घालवले. प्रतिभा अडवाणी म्हणाल्या, इतका मोठा पुरस्कार देऊन त्यांचा सन्मान केल्याबद्दल त्यांनी पंतप्रधान मोदी आणि देशातील जनतेचे आभार मानले.

## विद्यार्थ्यांच्या भविष्यासाठी विद्यापीठांनी परीक्षांचे निकाल वेळेत जाहीर करा; राज्यपाल यांचे निर्देश

**■मुंबई। विशाल पाटील,**

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक वर्ष वाया जाऊ नये, नोकरीच्या संधीमध्ये अडचणी येऊ नयेत. विद्यार्थ्यांच्या भविष्याचा विचारू करून सर्व विद्यापीठांनी वेळेत अभ्यासक्रम पूर्ण करून परीक्षांचे निकाल वेळेत जाहीर करावेत, असे निर्देश राज्यपाल रमेश बैस यांनी दिले. राजभवन येथे राज्यपाल बैस यांच्या अध्यक्षतेखाली कुलगुरू संयुक्त मंडळाची बैठक संपन्न झाली.राज्यपाल म्हणाले की, महाविद्यालयांनी एकत्रित येऊन क्लस्टर युनिव्हर्सिटी बनविण्याचा प्रयत्न करावे. शिवाय विद्यापीठांनी ऑलिम्पिक विजेते तयार होण्यासाठी



प्रयत्न करावेत. नवीन शैक्षणिक धोरणाच्या अंमलबजावणीसाठी शासन अग्रेसर आहे. प्रत्येक कुलगुरूनी विद्यापीठामध्ये नवीन शैक्षणिक धोरण अंमलबजावणी आणि केलेल्या कार्यवाहीबाबत सविस्तर अहवाल पाठवावा. जर्मनी, जपान, इस्त्राईल यासारख्या देशांनी भारताकडून कुशल मनुष्यबळाची अपेक्षा केली आहे. महाराष्ट्राकडून कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देणे आणि व्यवसायाभिमुख शिक्षणावर अधिक भर देऊन रोजगार निर्मितीकडे लक्ष द्यावे.

उच्च शिक्षणामध्ये महाराष्ट्र नेहमीच अग्रेसर राहिलेला आहे. ठक्कक्रैंकिंगमध्ये सुद्धा महाराष्ट्रातील विविध महाविद्यालये, विद्यापीठाचा समावेश वाढवा. यासाठी प्रयत्न करावे, अशी अपेक्षाही यावेळी व्यक्त केली. आपण छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाचा ३५० वा वर्धापन दिन साजरा करत आहोत. यानिमित्त पारंपरिक खेळांना प्रोत्साहन द्यावे.

## औद्योगिक पट्टयातील टोळ्यांवर प्रतिबंधात्मक कारवाई करणार - पोलीस अधीक्षक पंकज देशमुख



**■ पुणे। अभिजीत येरल्लू,**

पुणे जिल्ह्यातील औद्योगिक पट्ट्यामध्ये उद्योजकांकडून खंडणी मागण्याचे प्रकार घडत आहेत. उद्योजकांनी जर पुढे येऊन तक्रारी केल्यास खंडणीखोरांवर गुन्हे दाखल करु, असे आश्वासन नवनियुक्त पोलीस अधीक्षक पंकज देशमुख यांनी उद्योजकांना दिले आहे. त्यांनी औद्योगिक पट्ट्यातील टोळ्यांवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्याचेही संकेत दिले आहेत. पंकज देशमुख यांनी नुकताच अधिक्षक पदाचा कार्यभार स्विकारला, यानंतर त्यांनी आज(शनिवार) माध्यमांशी संवाद साधला. देशमुख म्हणाले, जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात औद्योगिक वसाहती आहेत. येथे स्क्रॅप मालासाठी अनेकदा उद्योजकांना धमकावले जाते. तसेच विविध कारणांसाठी खंडणी उकळली जात असल्याचे निदर्शणास आले आहे. याप्रकारच्या टोळ्यांवर प्रतिबंधात्मक कारवाईचा भर देण्यात येणार आहे. शिवाय उद्योजकांनी पुढे येऊन तक्रारी दिल्यास गुन्हेही नोंदवले जातील. जिल्ह्यात कायदा आणि सुव्यवस्थेच्या दुष्टीने कामकाज केले जाईल.

## कंगना राणावतला दिलासा नाहीच, मानहानीच्या दाव्यावर स्थगिती देण्यास हायकोर्टाचा नकार



**■मुंबई। विशाल कारंडे,**

प्रसिद्ध गीतकार जावेद अख्तर यांनी दाखल केलेल्या मानहानीच्या खटल्यावरील सुनावणीस स्थगिती द्यावी, अशी मागणी करणारी बॉलिवूड अभिनेत्री कंगना राणावतची याचिका शुक्रवारी मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळ्ली. कंगना राणावत हिने एका वृत्तवाहिनीला मुलाखत देताना जावेद अख्तर यांच्यावर शेरेबाजी केली होती. त्यावर अख्तर यांनी आक्षेप घेत कंगनाविरोधात मानहानीचा दावा दाखल केला. दरम्यान, कंगनाने अख्तर यांच्याविरोधात क्रॉस तक्रार दाखल केली. गुन्हेगारी कट रचणे, खंडणी वसूल करणे, तिच्या खासगी आयुष्यात लुडबूड करणे इत्यादी आरोप कंगनाने अख्तर यांच्यावर केले आहेत. अख्तर आणि आपण केलेली तक्रार एकाच घटनेतून करण्यात आली आहे. त्यामुळे दोन तक्रारींवर वेगवेगळे निर्णय घेतले जाऊ नयेत. याकरिता दोन्ही तक्रारींवर एकदम सुनावणी घेण्यात यावी, अशी मागणी कंगनाने याचिकेद्वारे केली होती. तिची याचिका फेटाळ्ताना न्या. प्रकाश नाईक यांच्या एकलपीठाने म्हटले की, अख्तर यांनी दाखल केलेल्या दाव्यावरील खटला सुरू झाला आहे. या टप्प्यावर कंगनाने केलेली विनंती मान्य करू शकत नाही.

## थोडा उशीर पण निवड योग्य, अडवाणींचे अभिनंदन करताना शरद पवारांनी व्यक्त केली खंत



**■मुंबई। दिगंबर जाधव,**


भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण अडवाणींना देशातील सर्वोच्च पुरस्कार समजला जाणार भारतरत्न जाहीर करण्यात आला आहे. त्यानंतर देशभरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. राष्ट्रवादीचे सर्वेसर्वा शरद पवारांनी देखील अभिनंदन केले आहे. भारतरत्न जाहीर झालेली दोन्ही नावं अतिशय योग्य असून थोडा उशीर झाला पण योग्य निवड आहे, असे म्हणत शरद पवारांनी भारतीय जनता पक्षाला (भाजप) टोमणा मारला आहे. ते पुण्यात माध्यमांशी बोलत होते. त्यावेळी त्यांनी विविध विषयांवर आपले मत व्यक्त केले आहे.

शरद पवार म्हणाले, भारतरत्न जाहीर झालेली कपुरी ठाकूर आणि लालकृष्ण आडवाणी दोन्ही नावं अतिशय योग्य आहेत. अडवाणी देशाच्या संसदेत अनेक वर्ष होते. भाजपचे नेते, संसदेचे सदस्य, मंत्री म्हणून आदर्श काम करत आहेत. थोडा उशीर झाला पण योग्य निवड आहे. बिहारचे माजी मुख्यमंत्री कपुरी ठाकूर आणि लालकृष्णी अडवाणी संसदेत अनेक वर्षे होते. त्यांचा पराभव कधी झाला नाही, रथयात्रा काढली तेव्हा एकदा मतभेद झाले.थोडा उशीर झाला पण योग्य निवड आहे. त्यांना सन्मान मिळला आहे,आता समाधान व्यक्त करतो. त्यांच्या पक्षात काय घडलं याच्या खोलात जात नाही. उल्हासनगर गोळीबार प्रकरणी बोलताना शरद पवार म्हणाले, सत्तेचा गैरवापर केला जात आहे. कायदा हाती घेणाऱ्यांना मोकळीक दिली जात आहे. सरकारची बघ्याची भूमिका असेल तर राज्य कोणत्या दिशेला जातंय याचा विचार केला पाहिजे. कायदा हातात घेणाऱ्या विरोधात गैरवापर होत आहे. राज्य सरकारची सगळ्या बाबतीत बघ्याची भूमीका घेते असे वाटते. अशा गोष्टी महाराष्ट्र नागरिकांच्या दृष्टीने चिंताजनक आहे. महाविकास आघाडीमध्ये जागावाटप चर्चा चांगली झाली, जागा जिंकणे महत्वाचे असले तरी कशासाठी हे महत्वाचे असतात. जागावाटपाचा 9 ते 10 फेब्रुवारीपर्यंत तिढा सुटेल.

## 'त्या' ३०४ गिरणी कामगारांना मिळाले हक्काचे घर!

**■मुंबई। अनिकेत भंकाळ,**

'म्हाडा'च्या मुंबई मंडळातर्फे २०२० मध्ये बॉम्बे डाईंग मिल व श्रीनिवास मिलमधील गिरणी कामगारांसाठी जाहीर केलेल्या सोडतीतील यशस्वी पात्र ३०४ गिरणी कामगार-वारस यांना नवव्या व दहाव्या टप्प्याअंतर्गत नुकतेच घरांच्या चाव्यांचे वाटप करण्यात आले. वांद्रे पूर्व येथील समाज मंदिर हॉल येथे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण व गिरणी कामगार घर संनियंत्रण समिती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित कार्यक्रमाला गिरणी कामगार घर संनियंत्रण समितीचे अध्यक्ष व आमदार सुनील राणे, आमदार कालिदास



कोळंबकर, उपमुख्य अधिकारी योगेश महाजन उपस्थित होते. बंद, आजारी अशा ५८ गिरण्यांमधील यापूर्वी झालेल्या सोडतीमध्ये यशस्वी न झालेल्या एकूण १,५०,४८४ गिरणी कामगार व त्यांच्या वारसांची पात्रता निश्चिती करण्याकरिता कालबद्ध विशेष अभियान सुरू आहे. या अभियानाला गिरणी कामगार, वारसांचा वाढता प्रतिसाद बघता या अभियानाला १५ फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. गेल्या आठ महिन्यांपासून सुरू असलेल्या या विशेष अभियानात गिरणी कामगार व त्यांच्या वारसांकडून ऑफलाइन व ऑनलाइन पद्धतीने एकूण १,०६,८५१ अर्ज प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ८७,६९५ अर्जदार पात्र ठरले असून, उर्वरित अर्जांची छाननी करून पात्र-अपात्र निश्चितीची कार्यवाही सुरू आहे. आतापर्यंत २०२० मध्ये गिरणी कामगारांसाठी काढण्यात आलेल्या सोडतीतील यशस्वी पात्र व सदनिकेच्या विक्री किमतीचा, मुद्रांक शुल्काचा भरणा केलेल्या १७७४ गिरणी कामगारांना १५ जुलैपासून दहा टप्प्यांत सदनिकांच्या चावींचे वाटप करण्यात आले आहे.

## जप्तीचे संकट टळल्याने सिडकोने सोडला सुटकेचा नि:श्वास; अलिबाग न्यायालयाच्या आदेशाला उच्च न्यायालयाची स्थगिती

**■नवी मुंबई। अनिकेत भंकाळ,**

वाढीव नुकसानभरपाईपोटी ७२२ कोटी रक्कम वसूल करण्यासाठी अलिबाग न्यायालयाने दिलेल्या जप्ती वॉरंटच्या आदेशाला उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने सिडकोवरील मोठे संकट टळले आहे. अलिबाग न्यायालयाने दिलेल्या जप्ती वॉरंटच्या आदेशाविरोधात सिडकोने मंगळवारी उच्च न्यायालयात रिट याचिकेद्वारे धाव घेतली होती. तीवर बुधवारी झालेल्या सुनावणीत उच्च न्यायालयाने स्थगिती दिल्याने सिडकोला तूर्तास मोठा दिलासा मिळाला आहे. वाघिवली येथील



१५२ एकर भूसंपादनापोटी मुंदडा परिवारास वाढीव नुकसानभरपाईपोटी मंजूर केलेली ७२२ कोटींची रक्कम सिडकोने न दिल्याने अलिबाग न्यायालयाने सिडकोविरोधात जप्ती वॉरंट बजावले होते. हे जप्ती वॉरंट बजावण्यासाठी मुंदडा परिवारातील सदस्यांसह त्यांचे वकील व कोर्टाचे बेलिफ सिडकोत पोहोचले. या जप्ती वॉरंटमध्ये सिडकोतील व्यवस्थापकीय व सहव्यवस्थापकीय संचालकांच्या वाहनांसह त्यांच्या कार्यालयातील ५००० खुर्च्या, २५०० टेबल, २००० पंखे, १००० कपाटे, ५०० एसी, १००० संगणक आणि सिडकोच्या मालकीची इतर वाहने आणि साहित्य जप्त करण्याचे नमूद केले होते. मात्र, उच्च न्यायालयाने अलिबाग न्यायालयाच्या जप्ती आदेशाला स्थगिती दिल्याने जप्ती वॉरंटची अंमलबजावणी करण्यासाठी आलेल्या मुंदडा परिवार, बेलिफ व वकिलांना माघारी फिरावे लागले.